# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहरामध्ये आयोजित विविध कार्यक्रमाकरीता तात्पुरती प्रकाश व इतर
**{विद्युत विभाग}** व्यवस्था करण्याकरीता वार्षिक दर निश्चित करण्याकरीता दर-सूची तयार करण्यात आलेली आहे. विविध कार्यक्रमाकरीता लागणारी तात्पुरती प्रकाश व्यवस्था व इतर व्यवस्था जसे जनरेटर्स, एल.ई.डी. स्क्रीन, ध्वनी व्यवस्था करण्याकरीता करण्यात येणाऱ्या कामाच्या मागणीनुसार व आवश्यकतेनुसार कामाचे प्राकलन मंजूर दरसुची नुसार तयार करुन त्यास विविध बजेट पदार्तंगत प्रावधान, तांत्रिक मंजुरी प्राप्त झाल्यावर व सक्षम प्राधिकरणाची मंजूरी घेवून मंजूर कंत्राटदाराला कार्यादेश देवून कामे करण्यात येईल. याकरीता अल्प मुदतीची पंधरा दिवसांची निविदा बोलावून सदर कामाचे वार्षिक दर निश्चित करुन दर करार करण्यास्तव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप** :- १) सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.
२) दर सुची मध्ये विभागीय सी.एस.आर. २०२२-२३ व मंजूर दर घेण्यात आलेले आहेत.
३) सदर दर करारार्तंगत कामाचा खर्च रु. ६० लक्ष पर्यंत खर्च सिमित ठेवण्यात येईल.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 132/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 01/11/2022**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरामध्ये आयोजित विविध कार्यक्रमाकरीता तात्पुरती प्रकाश व इतर व्यवस्था करण्याकरीता वार्षिक दर निश्चित करण्याकरीता दर-सूची तयार करण्यात आलेली आहे. विविध कार्यक्रमाकरीता लागणारी तात्पुरती प्रकाश व्यवस्था व इतर व्यवस्था जसे जनरेटर्स, एल.ई.डी. स्क्रीन, ध्वनी व्यवस्था करण्याकरीता करण्यात येणाऱ्या कामाच्या मागणीनुसार व आवश्यकतेनुसार कामाचे प्राकलन मंजूर दरसुची नुसार तयार करुन त्यास विविध बजेट पदार्तंगत प्रावधान, तांत्रिक मंजुरी प्राप्त झाल्यावर व सक्षम प्राधिकरणाची मंजूरी घेवून मंजूर कंत्राटदाराला कार्यादेश देवून कामे करण्यात येईल. याकरीता अल्प मुदतीची पंधरा दिवसांची निविदा बोलावून सदर कामाचे वार्षिक दर निश्चित करुन दर करार करण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**